॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

जग सुंदर आहे, फक्त पाहण्याचा दृष्टिकोन सुंदर असावा!

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### नवसाक्षर

शाळेतील विद्यार्थी द्या
असेच वाऱ्यावर सोडून
निरक्षर म्हातारे शोधून
ऑनलाईन द्या जोडून
कोणत्याही घाण्याला जुंपा
शिक्षक म्हणजे बैल आहे?
कोणीही येऊन ओढायला
त्याचाच लगाम सैल आहे?

## SPOT NEWS

### तब्बल ४३ लाख रेशन कार्ड संशयित!

● **मुंबई** – महाराष्ट्रातील रेशन कार्ड आणि सार्वजनिक वितरण प्रणालीबाबत मोठी आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्यात रेशन व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी राबवण्यात आलेल्या विशेष मिशन सुधार मोहिमेदरम्यान तब्बल ४३ लाख ३ हजार संशयित आणि अपात्र रेशन कार्ड आढळून आली आहेत. या प्रकारामुळे अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील गैरप्रकार पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. मिशन सुधार मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या तपासणीत अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या, तसेच इन्कम टॅक्स भरणा-या काही व्यक्तींकडूनही रेशन कार्डचा लाभ घेतला जात असल्याचे आढळले. याशिवाय मृत व्यक्तींच्या नावावर रेशन कार्ड कायम ठेवून धान्याची उचल करण्यात आल्याची प्रकरणेही समोर आली आहेत. त्यामुळे रेशन कार्ड पडताळणी आणि सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. रेशन धान्याचा लाभ हा प्रामुख्याने गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी असतो. मात्र, अपात्र व्यक्ती तसेच मृत व्यक्तींच्या नावावर धान्याचा लाभ घेतला जात असल्याने प्रत्यक्ष गरज असलेल्या लाभार्थ्यांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सरकारकडून गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी मोठ्या प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते.

### एसटीच्या स्मार्ट कार्डसाठी १ कोटींहून अधिक प्रवाशांची नोंदणी

● **मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि डिजिटल प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'एनसीएमसी' स्मार्ट कार्डला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १२ ऑगस्टपर्यंत राज्यात तब्बल १ कोटी १ लाख ७३ हजार ८३८ प्रवाशांनी 'एनसीएमसी' स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी ६४ लाख ९१ हजार ६५ कार्डे सक्रिय झाली आहेत. 'एनसीएमसी'स्मार्ट कार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील तिकीट व्यवहार अधिक सुलभ आणि कॅशलेस करण्याच्या दिशेने महामंडळाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. पहिल्या टप्प्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना 'एनसीएमसी' स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात येत आहे. येत्या १ सप्टेंबरपासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी 'एनसीएमसी'स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे.

# मढीतील कानिफनाथ मंदिरात गर्दीतून महिलांचे मंगळसूत्र लंपास

## नऊ संशयित महिला पोलिसांच्या ताब्यात । अमावस्येला चोरीच्या घटनांनी भाविक त्रस्त

● **पाथर्डी । वीरभूमी–**

अमावस्येनिमित्त मढी येथील श्री कानिफनाथ गडावर लाखो भाविकांची गर्दी झाली होती. या गर्दीचा फायदा घेत मंदिरात दर्शनासाठी आलेल्या महिला भाविकांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व दागिने चोरणाऱ्या महिलांच्या टोळीचा पाथर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला. या प्रकरणी नऊ संशयित महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दाखल फिर्यादीनुसार, सुमारे तीन तोळे वजनाचे आणि अंदाजे १ लाख १२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेले आहेत. याबाबत वैष्णवी रोशन चौगुले (वय २२, रा. पारगाव, जि. पुणे) यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी या पती व कुटुंबीयांसह चारचाकी वाहनाने पुणे जिल्ह्यातील आळे येथून मढी येथे कानिफनाथ महाराजांच्या दर्शनासाठी आल्या होत्या. सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास मंदिरात दर्शन घेत असताना गर्दीत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र कोणीतरी ओढल्यासारखे त्यांना जाणवले. त्यांनी तत्काळ गळ्यात पाहिले असता सोन्याचे मंगळसूत्र गायब असल्याचे निदर्शनास आले.

दरम्यान, गर्दीतून एक महिला घाईघाईने निघून जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर मंदिर परिसरातील नागरिक व पोलिसांनी संशयित महिलांचा शोध सुरू केला. काही महिलांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांच्या हालचाली संशयास्पद आढळून आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



### देवस्थानचे पावित्र्य जपण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

■ देवस्थानचे पावित्र्य व महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी देवस्थान ट्रस्ट, विश्वस्त, कर्मचारी आणि मढी ग्रामस्थांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे भाविकांकडून सांगण्यात येत आहे. देवस्थानचे विश्वस्त अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू असून, त्यांना इतरांनीही प्रामाणिक साथ देणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया भाविकांनी व्यक्त केली.

पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आलेल्या महिलांमध्ये रुक्मिणी महादेव जाधव (रा. वडवणी), गजराबाई कोल्हापूर शिंदे (ता. गेवराई), शेशुबाई किरण पांड्या जाधव (रा. घनसांगवी, ता. जालना), ताई किरण शिंदे (ता. अंबड, जि. जालना), फुलाबाई गणेश पवार (रा. वाळुंज), संगीता रतन शिंदे (ता. परतूर), उषा अंकुश शिंदे (रा. घनसांगवी), ज्योती सुमिन शिंदे (रा. आष्टी, ता. परतूर) आणि नंदिनी अमोल ऊर्फ महादेव शिंदे (रा. आष्टी, ता. घनसांगवी) यांचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या महिलांनी गर्दीचा फायदा घेत विविध भाविक महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व दागिने चोरल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

मढी येथील प्रसिद्ध कानिफनाथ मंदिरात राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, गर्दीचा गैरफायदा घेऊन दागिने लंपास करणाऱ्या टोळ्यांमुळे भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मढी येथे दर अमावस्येला वाहनचोरी, अवैध पार्किंग, दागिने व साखळीचोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने लांबवरून येणाऱ्या भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे भाविक सांगतात. पाकीटमारीनंतर अनेक भाविकांकडे घरी परतण्यासाठीही पैसे राहत नाहीत. त्यामुळे काहींवर मंदिर परिसरातच मदत मागण्याची वेळ येते. लहान मुले व महिलांनाही उपासमारीचा सामना करावा लागत असल्याची कैफियत भाविकांनी मांडली आहे.

भाविकांच्या म्हणण्यानुसार, लुटमारीबरोबरच वाहतूक कोंडी आणि त्यातून होणाऱ्या अरेरावीच्या घटनाही वाढत आहेत. चोरीच्या घटना घडल्यानंतर चोरांना पकडण्यासाठी पोलिसांची तत्परता दिसत नसल्याने पोलिसांच्या भूमिकेबाबतही काही भाविकांनी नाराजी व्यक्त केली आहे.



## दीप अमावस्येनिमित्त मोहटादेवी मंदिराचा गाभारा दीपप्रकाशाने उजळला

● **पाथर्डी । वीरभूमी–**

श्रीक्षेत्र मोहटादेवी गड येथे आषाढ अमावस्या अर्थात दीप अमावस्येचे औचित्य साधून मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात पारंपरिक पद्धतीने भक्तिभावात दीपपूजन सोहळा संपन्न झाला. 'तमसो मा ज्योतिर्गमय' अर्थात अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या या पर्वानिमित्त पवित्र श्रावण महिन्याच्या स्वागतासाठी आणि जगदंबा माता मोहटादेवीच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले होते.

श्री मोहटादेवीची विधिवत महापूजा देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांच्या हस्ते करण्यात आली. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात पारंपरिक समयांसह चांदीचे व पितळी निरांजन प्रज्वलित करण्यात आले होते. दिव्यांच्या लखख प्रकाशाने संपूर्ण गाभारा उजळून निघाला होता. या पूजेचे पौरोहित्य भूषणदेव साकरे, भास्कर देशपांडे व विकास क्षीरसागर यांनी केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, कर्मचारी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीप अमावस्येनिमित्त दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. दिव्यांच्या प्रकाशामुळे संपूर्ण गडावर सकारात्मक ऊर्जा आणि चैतन्य निर्माण झाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली.

दरम्यान, श्री मोहटादेवी गडाकडे येणाऱ्या घाटरस्त्याचे काम पूर्ण झाले असून मंदिर परिसरातील डोंगररांगा व आजूबाजूचा परिसर हिरव्यागार वनश्रीने नटला आहे. निसर्गरम्य वातावरण, सुंदर घाटरस्ता आणि मंदिराजवळील व्ह्यू पॉइंट्स यामुळे मोहटादेवी मंदिर परिसर पर्यटकांचे आकर्षण ठरत असून सेल्फी व फोटोग्राफीसाठीही भाविक-पर्यटकांची पसंती मिळत आहे.

देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसाद, पिण्याचे पाणी, पार्किंग तसेच प्रत्येक भाविकाला सुरळीत दर्शन घेता यावे यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

दीप अमावस्येच्या पर्वकाळात गर्भगिरी डोंगररांगेतील श्री मोहटादेवी, मायंबा, मढी व वृद्धेश्वर येथे लाखो भाविकांनी गर्दी केली. त्यामुळे परिसरातील सर्व रस्ते वाहने आणि भाविकांच्या गर्दीने फुलून गेले होते.

# शालार्थ घोटाळ्यातील शिक्षणाधिकारी फरार

● **नाशिक । वीरभूमी–**

शालार्थ आयडी घोटाळ्यातील संशयित आरोपी तथा नाशिक जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव यांना शासनाने निलंबित केले आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यात संशय तसेच गडचिरोली येथे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी म्हणून बदली झाल्यानंतर कर्तव्यावर नियमित हजर न राहणे या कारणांमुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्याच्या माध्यमातून शासनाची १६० कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडून या घोटाळ्याचा तपास सुरु असतानाच बच्छाव यांच्या निलंबनाचे आदेश निघाल्याने शैक्षणिक व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने बच्छाव यांना निलंबित केले आहे.

सध्या ते फरार असून, नाशिक पोलिस आयुक्तालयाचे विशेष तपास पथक त्यांचा शोध घेत आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्यासंदर्भात बच्छाव यांच्याविरुद्ध नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यांचा सहभाग समोर आल्यानंतर ते फरार झाले असून विशेष तपास पथकाकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. बच्छाव यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित असून, त्यांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करण्याचे आदेशही शासनाने दिले आहेत. गडचिरोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सादर केलेल्या वस्तुस्थिती अहवालानंतर कारवाईची प्रक्रिया पुढे सरकली.

नाशिक ग्रामीण आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासातील बाबी तसेच कार्यालयात विनापरवानगी गैरहजर राहिल्याचा आरोप या सर्व बाबींचा विचार करून शासनाने बच्छाव यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला. १३ मार्च २०२६ रोजी गडचिरोली कार्यालयात हजर झाल्यानंतर बच्छाव यांनी कोणताही रजा अर्ज न देता पुन्हा गैरहजेरी लावल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ विनापरवानगी गैरहजर राहणे ही कर्तव्यविन्मुखता ठरत असल्याने विभागीय चौकशीची शिफारस करण्यात आली होती.

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी बच्छाव यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाचा विचार केल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांनुसार बच्छाव यांना शासन सेवेतून निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. निलंबनाचा कालावधी सुरू असताना त्यांना शासनाच्या नियमानुसार निर्वाहभत्ता आणि परिभ्रमण भत्ता देण्यात येणार आहे. निलंबनाच्या काळातील पुढील कार्यवाही आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी करावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# राज्यातही पेपरफुटीला चाप; केंद्राचा कायदा करणार लागू

● **मुंबई । वीरभूमी–**



शासकीय सेवा भरतीच्या परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. पेपरफुटी आणि परीक्षा गैरव्यवहार रोखण्यासाठी परीक्षा पद्धतीत सर्वंकष सुधारणा करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती काम करणार आहे. पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम हे समितीचे सदस्य असतील. समिती प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी थेट संवाद साधणार आहे. त्यांच्या सूचना व अनुभवांच्या आधारे राज्यातील भरती परीक्षांसाठी समग्र धोरण आणि सुधारणा अहवाल तयार केला जाणार आहे. परीक्षांमधील गैरव्यवहारासंदर्भात महाराष्ट्रात स्वतंत्र कायदा असला तरी केंद्राचा कायदा अधिक कठोर असल्याने तो राज्यात लागू करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. स्पर्धा परीक्षा अत्यंत गोपनीय आणि सुरक्षित वातावरणात घेता याव्यात यासाठी राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरूम उभारण्याचे निर्देशही देण्यात आले. यामुळे परीक्षेतील गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होईल.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे 'वर्षा' बंगल्यावर!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट

● **मुंबई । वीरभूमी–**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भल्या सकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अचानक भेट घेतली. राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांची अधिकृत निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यावर जाऊन फडणवीस यांची भेट घेतली व त्यांना पुष्पगुच्छ दिला. मागील काही दिवसांपासून राज ठाकरे राज्य सरकारवर अत्यंत आक्रमकपणे टीका करत असतानाच ही सरप्राइज भेट झाल्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.



दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली किंवा ही भेट नेमकी कोणत्या कारणासाठी होती, याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र, मागील काही दिवसांत राज ठाकरे यांनी सरकारवर अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले होते.

मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था, रस्त्यांवरील खड्डे, जेन-जी आंदोलन आणि नाशिक दौऱ्यादरम्यान कुंभमेळ्याच्या नियोजनावरून ठाकरेंनी सरकारवर थेट निशाणा साधला होता. या पार्श्वभूमीवर, महामार्ग आणि खड्ड्यांच्या प्रश्नावर मख्यमंत्र्यांशी थेट चर्चा करून लवकरात लवकर तोडगा काढावा, यासाठी राज ठाकरे भेटायला गेल्याचा एक तर्क लावला जात आहे.

या भेटीदरम्यान मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक हेदेखील राज ठाकरे यांच्यासोबत उपस्थित होते. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच शिवाजी पार्क मैदानाच्या दुरवस्थेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे नवीन स्टेडियम उभारणीबाबत किंवा शिवाजी पार्क मैदानाच्या विकासाबाबत कोणताही विशेष प्लॅन घेऊन ठाकरे मुख्यमंत्र्यांकडे गेले होते का? अशीही चर्चा रंगू लागली आहे. अचानक झालेल्या या भेटीमुळे राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात उत्सुकता वाढली असून, लवकरच या भेटीचे मुख्य कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# मुलं ही आई वडिलांची मालमत्ता नाहीत : नागपूर खंडपिठाचे स्पष्टीकरण

● **मुंबई । वीरभूमी–**

मुले ही तुमची मालमत्ता नाहीत, तुम्ही त्यांचे आई वडील आहात मालक नाही असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. जी मुले १८ वर्षे वयाच्या वरची आहेत, म्हणजेच जी मुले प्रौढ आहेत ते त्यांचा निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र आहेत. ते त्यांच्या आई वडिलांची प्रॉपर्टी नाहीत असेही नागपूर खंडपीठाने म्हटले आहे.

एका आईने मुलीच्या विरोधात केलेली याचिका ही न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यामध्ये आईने हे म्हटले होते की माझी मुलगी माझ्या मर्जीशिवाय एका वेगळ्या पुरुषाबरोबर राहते आहे तिचा ताबा मला मिळावा. मात्र ही मुलगी सज्ञान असल्याने तिला तिचे निर्णय स्वातंत्र्य आहे म्हणत नागपूर खंडपीठाने ही याचिका



फेटाळून लावली आहे.

सज्ञान मुलीचा ताबा मिळावा म्हणून एका आईने कोर्टात याचिका दाखल केली होती. ही मुलगी नागपूरची आहे. तिने वयाच्या १७ व्या वर्षी ट्यूशनला जाते म्हणून घर सोडले. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेजनुसार हे दिसून आले की ती एका तरुणासह गेली आहे. पोलिसांनी या मुलीला शोधून आणले आणि तिच्या आईकडे सोपवले. त्यानंतर काही दिवसांनी ही मुलगी परत घर सोडून गेली. ज्यानंतर या मुलीच्या आईने कोर्टात दाद मागितली. मात्र मुलगी सज्ञान असल्याने तिला तिचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे हे सांगत कोर्टाने याचिका फेटाळली आहे.

या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान मुलीला हजर करण्यात आले. तिने हे सांगितले की तिने तिच्या मर्जीने तिचं घर सोडले आहे. ती ज्या तरुणासह राहते आहे तो सर्वस्वी तिचा निर्णय आहे. कोर्टाने या मुलीचे वय पाहिले ती सज्ञान आहे त्यामुळे तिला तिचा जीवनसाथी निवडण्याचा अधिकार आहे. हाच निकष लावत न्यायालयाने तिच्या आईची याचिका फेटाळून लावली. मुलगी बेकायदेशीर रित्या तरुणासह राहते आहे हा याचिकेतला दावाही कोर्टाने खोडून काढला. कारण मुलगी तिच्या मर्जीने राहते आहे हे तिने मान्य केले आहे.

### आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकासह दोन अधीक्षकांवर गुन्हे दाखल

● **मुंबई । वीरभूमी–**

धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेतील तीन विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याप्रकरणी मुख्याध्यापकासह दोन अधीक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रशांत ताटपल्लीवार, अधीक्षिका भाग्यश्री चिलमवार व अधीक्षक भास्कर भोयर अशी गुन्हे दाखल झालेल्या कर्मचा-यांची नावे आहेत. सोमवारी मध्यरात्री जपतलाई येथील अनुदानित आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनी आजारी पडल्या. यावेळी केलेल्या चौकशीत मुख्याध्यापक, मुलींच्या अधीक्षिका व मुलांचे अधीक्षक दोषी आढळल्याने सहायक प्रकल्प अधिकारी प्रभू सादमवार यांनी धानोरा पोलिस ठाण्यात तक्रार केली. त्यानुसार, पोलिसांनी प्रशांत ताटपल्लीवार, भाग्यश्री चिलमवार व भास्कर भोयर यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत.

SPOT NEWS

## रामवाडीच्या लक्ष्मीआई यात्रेत पारंपारिक पोतराजांच्या नृत्याने वेधले लक्ष

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील रामवाडी परिसरात लक्ष्मीआई यात्रा उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रामवाडी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या भव्य शोभायात्रेत महिला, युवक, पोतराज तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण रामवाडी परिसर लक्ष्मीमातेच्या जयघोषाने दुमदुमून गेला. या यात्रेला तब्बल ५० वर्षांची परंपरा असून, दरवर्षी रामवाडी येथे लक्ष्मीआई यात्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदाच्या यात्रेतही पारंपरिक धार्मिक परंपरा जपत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेच्या निमित्ताने परिसरात सकाळपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीद्वारे आणलेल्या पवित्र जलाने रामवाडी येथील लक्ष्मीमातेच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. विधिवत पूजा–अर्चा करून लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने देवीचे दर्शन घेतले. शोभायात्रेत संबळ, हलगी, ढोल आणि ताशांच्या निनादाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. पारंपरिक वेशभूषेतील पोतराजांनी देवीप्रती श्रद्धा व्यक्त करत पारंपरिक पद्धतीने आसूडचे फटके ओढले. आसूड ओढताना होणारा 'चट्ट... चट्ट...' आवाज परिसरात घुमत होता. या पारंपरिक सादरीकरणामुळे यात्रेचे विशेष आकर्षण वाढले. यात्रेनिमित्त माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे हे वर्षातून एकदा पोतराजाचा साज चढवून लक्ष्मीमातेला अभिवादन करतात आणि यात्रेत सहभागी होतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बबन लोखंडे, लखन लोखंडे, गणेश गायकवाड, लक्ष्मण नवगिरे, रोहित शेलार, ऋतिक शेरकर, गोपाल शिंदे, कैलास शिंदे आदी पोतराजांनी शोभायात्रेत सहभाग घेतला. यावेळी वाजंत्री म्हणून राहुल वैरागर, विशाल वैरागर, यादव खुडे, सागर खुडे, संजय चांदणे आदी सहभागी झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या तालावर भाविकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

## रोहिणी पवार यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्काराने गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



महिला सक्षमीकरण, ग्रामविकास आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत रणरागिणी मल्टीपर्पज फाऊंडेशनच्या अध्यक्षा रोहिणी पवार यांना पुण्यातील राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यात 'राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. क्रांती दिनानिमित्त पुण्यातील महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथे मातोश्री द्रोपदा बबन पठारे चॅरिटेबल ट्रस्ट, छत्रपती शेतकरी सेना तसेच बहुजन भूमी संघटना संचलित मानव हक्क, माहिती अधिकार, दक्ष पोलिस मित्र सहकार सेनेच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर आणि सामाजिक कार्यकर्ते तथा पक्षीमित्र विजय भालसिंग यांच्या हस्ते रोहिणी पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष कैलास पठारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष रशीद पठाण, राष्ट्रीय महिला अध्यक्षा रोहिणी भोसले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.रोहिणी पवार गेल्या अनेक वर्षांपासून महिला सक्षमीकरण, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम, ग्रामविकास आणि बालविकास क्षेत्रात कार्यरत आहेत. महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर करणे, गृहउद्योगांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देणे, बचत गट स्थापन करून शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचे काम त्या सातत्याने करीत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराबद्दल रोहिणी पवार यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## जामगावच्या राजराजेश्वर मंदिराचा
# १७४६ सालचा शिलालेख उलगडतो इतिहासाची पाने

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील जामगाव हे ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेले गाव आहे. गावाच्या मध्यवस्तीत असलेल्या श्री राजराजेश्वर मंदिराच्या मुख्य सभामंडपाच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर एक महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आहे. अठराव्या शतकातील हा शिलालेख केवळ मंदिराच्या इतिहासाची नोंद करणारा नसून, तत्कालीन धार्मिक जीवन, स्थानिक कुटुंबांची सामाजिक ओळख आणि देवालयनिर्मितीच्या परंपरेवर प्रकाश टाकणारा महत्त्वाचा प्राथमिक ऐतिहासिक पुरावा आहे.

हा शिलालेख उठाव स्वरूपाचा असून देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेला आहे. एकूण पाच ओळींच्या या लेखावर अनेक वर्षे ऊन, वारा आणि पावसाचा परिणाम झाल्याने अक्षरे झिजून पुसट झाली आहेत. काही अक्षरे तुटून गहाळ झालेली आहेत. मात्र शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

**शिलालेखाचे वाचन**

**१.सके १६६८ क्षय नाम संवत**

**२.सरे वर्षे वैशाख वद ९ भृगु वासरे त**

**३.दीनी आष्टाधीकारी पोलोपनामा दतभ**

**४.ट से प्रपौत्र त्रींबकेन सप्रासाद राजराजेश्वर**

**५.प्रतीष्टा कृता**

या लेखानुसार शालिवाहन शक १६६८, क्षय नाम संवत्सर, वैशाख वद्य नवमी, भृगुवार अर्थात शुक्रवार, दिनांक २ मे १७४६ रोजी आष्टाधिकारी, 'पोळ' उपनाम असलेल्या दत्तभट यांचे प्रपौत्र त्रिंबक यांनी श्री राजराजेश्वर देवाची सप्रासाद प्रतिष्ठा केली.

या शिलालेखातील 'सप्रासाद' हा शब्द विशेष लक्षवेधी आहे. देवतेची प्रतिष्ठापना करण्याबरोबरच तिच्यासाठी देवालय अथवा प्रासादाची स्थापना करण्यात आल्याचे या उल्लेखातून सूचित होते. त्यामुळे हा लेख केवळ देवप्रतिष्ठेची नोंद नसून मंदिराच्या स्थापत्य इतिहासालाही महत्त्वाचा कालसंदर्भ देतो.

शके १६६८ म्हणजे इ.स. १७४६. त्या काळात छत्रपती थोरले शाहू महाराजांची कारकीर्द होती. त्यामुळे या शिलालेखाच्या माध्यमातून जामगाव परिसरातील धार्मिक आणि सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक निश्चित कालबिंदू उपलब्ध होतो.

शिलालेखात 'आष्टाधिकारी पोलोपनामा दतभट' असा उल्लेख येतो. त्यानंतर 'से प्रपौत्र त्रींबकेन' अशी नोंद आहे. यावरून दत्तभट यांचे 'पोळ' हे उपनाम असल्याचे दिसते आणि त्यांचे प्रपौत्र त्रिंबक हे राजराजेश्वर देवाच्या सप्रासाद प्रतिष्ठेचे कर्ते होते.

एखाद्या धार्मिक वास्तूच्या स्थापनेची नोंद करताना संबंधित व्यक्तीचे नाव आणि त्याच्या पूर्वजांची ओळख शिलालेखात नोंदविण्याची परंपरा त्या काळातील सामाजिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. दत्तभट पोळ आणि त्रिंबक पोळ यांच्या उल्लेखामुळे या कुटुंबाचा स्थानिक इतिहास, त्यांची सामाजिक भूमिका आणि धार्मिक कार्यातील योगदान यांचा मागोवा घेण्याची संधी मिळते.



अठराव्या शतकात स्थानिक प्रतिष्ठित व्यक्ती आणि कुटुंबांकडून मंदिरनिर्मिती, देवप्रतिष्ठा तसेच धार्मिक कार्यांना आश्रय देण्याची परंपरा होती. जामगावच्या राजराजेश्वर मंदिराचा हा शिलालेख त्या परंपरेची ठोस साक्ष देतो.

त्रिंबक यांनी राजराजेश्वर देवाची सप्रासाद प्रतिष्ठा केल्याची नोंद म्हणजे धार्मिक श्रद्धेबरोबरच त्या काळातील स्थानिक समाजातील प्रतिष्ठित कुटुंबांचा धार्मिक वास्तूंच्या उभारणीत असलेला सहभागही अधोरेखित करणारी आहे.

आज अस्तित्वात असलेल्या मंदिराच्या वास्तुरचनेचा अभ्यास करताना हा शिलालेख महत्त्वाचा ठरतो. शिलालेखातील इ.स. १७४६ हा स्पष्ट कालसंदर्भ मंदिराच्या मूळ उभारणीशी किंवा देवालयाच्या धार्मिक स्थापनेशी संबंधित घटनांचा अभ्यास करण्यास मदत करतो.

मंदिराची मूळ वास्तू, त्यानंतर झालेले जीर्णोद्धार, पुनर्बांधणी अथवा विस्तार यांचा अभ्यास शिलालेखातील माहिती आणि मंदिराच्या स्थापत्य वैशिष्ट्यांच्या तुलनेत केल्यास राजराजेश्वर मंदिराच्या वास्तु–इतिहासाची अधिक अचूक मांडणी करता येऊ शकते.

शिलालेखात शके १६६८, क्षय नाम संवत्सर, वैशाख वद्य नवमी आणि भृगुवार अशी कालगणनेची सविस्तर नोंद आहे. त्यामुळे मंदिराच्या प्रतिष्ठापनेचा काल निश्चित करण्यासाठी हा लेख अत्यंत महत्त्वाचा ठरतो. शिलालेखांमध्ये तिथी, वार, संवत्सर आणि शक यांचा उल्लेख आढळणे हे इतिहास संशोधकांसाठी मौल्यवान ठरते, कारण अशा नोंदींची तुलना इतर समकालीन कागदपत्रे, दानपत्रे, देवस्थान नोंदी, वंशावळी आणि अन्य शिलालेखांशी करता येते.

राजराजेश्वर मंदिराच्या सभामंडपातील हा शिलालेख म्हणजे जामगावच्या इतिहासाची दगडावर कोरलेली साक्ष आहे. २ मे १७४६ रोजी त्रिंबक यांनी केलेली राजराजेश्वर देवाची सप्रासाद प्रतिष्ठा, त्यामागील पोळ कुटुंबाचा सहभाग आणि दत्तभट यांचा वंशपरंपरागत उल्लेख यामुळे या लेखाला धार्मिक इतिहासाबरोबरच सामाजिक आणि कौटुंबिक इतिहासाच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व प्राप्त होते.

एकूणच, जामगावचा हा शिलालेख अठराव्या शतकातील धार्मिक श्रद्धा, मंदिरनिर्मितीची परंपरा, स्थानिक कुटुंबांचा धार्मिक आश्रय, देवप्रतिष्ठा आणि तत्कालीन कालगणना यांचा एकत्रित पुरावा आहे. त्यामुळे श्री राजराजेश्वर मंदिराचा इतिहास समजून घेण्यासाठी तसेच जामगाव आणि परिसराच्या सामाजिक–धार्मिक इतिहासाच्या संशोधनासाठी हा शिलालेख एक महत्त्वपूर्ण प्राथमिक साधन ठरतो.

या शिलालेखाचे वाचन संशोधन व माहिती पुणे येथील शिलालेखतज्ञ अनिल दुधाणे व शैलेंद्र भांडारे यांनी केले आहे त्यांना भूषण पोळ, सवित्र पोळ आणि प्रसाद मेहर यांची विशेष मदत झाली आहे.

## सोनेवाडी येथे शिर्डी-सावळीविहीर एमआयडीसीचे उत्तर प्रवेशद्वार उभारण्याच्या आ. विवेक कोल्हे यांच्या मागणीची दखल

**● कोपरगाव । वीरभूमी –**

नियोजित शिर्डी–सावळीविहीर औद्योगिक क्षेत्राचे (एमआयडीसी) उत्तर बाजूस मौजे सोनेवाडी (ता. कोपरगाव) येथे स्वतंत्र प्रवेशद्वार उभारण्याच्या आ. विवेक कोल्हे यांच्या मागणीला प्रशासकीय पातळीवर सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, याबाबत पुढील उचित कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सोनेवाडी येथे उत्तर प्रवेशद्वार उभारण्याच्या मागणीला आता प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे.

विधानपरिषद सदस्य आ. विवेक कोल्हे यांनी दि. १८ मे २०२६ रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे याबाबत पत्राद्वारे मागणी केली होती. या मागणीच्या अनुषंगाने उद्योगमंत्री कार्यालयाकडून दि. १५ जून २०२६ रोजी संदर्भपत्र काढण्यात आले होते. त्यानंतर संबंधित निवेदनाची दखल घेत अहिल्यानगर येथील महाराष्ट्र



औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नियोजित एमआयडीसीसाठी सोनेवाडी परिसरातील बहुतांश भूक्षेत्र संपादित करण्यात आलेले आहे. सध्या प्रस्तावित प्रवेशद्वार सावळीविहीर बाजूस असल्याने औद्योगिक क्षेत्रात ये–जा करणारी वाहतूक एकाच मार्गावर केंद्रित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका तसेच कामगार, उद्योजक आणि मालवाहतुकीसाठी वेळेचा अपव्यय होऊ शकतो.

सोनेवाडी येथे उत्तर प्रवेशद्वार झाल्यास वाहतुकीचे विभाजन होऊन कोंडी कमी होण्यास मदत होईल. कामगार व उद्योजकांचा प्रवासाचा वेळ वाचेल, मालवाहतूक अधिक सुरळीत होईल, औद्योगिक उत्पादनाची कार्यक्षमता वाढेल. तसेच रुग्णवाहिका, अग्निशमन दल यांसारख्या आपत्कालीन सेवांना औद्योगिक क्षेत्रात जलद पोहोचणे शक्य होणार आहे.

याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री कार्यालयासही सादर करण्यात आले होते. सदर निवेदन संबंधित कार्यालयास प्राप्त झाले असून, आता प्रादेशिक अधिकाऱ्यांनी योग्य कार्यवाही करून त्याचा अहवाल मुख्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सोनेवाडी उत्तर प्रवेशद्वाराच्या मागणीमुळे कोपरगाव तालुक्यातील औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## राज्य पत्रकार संघटनेच्या जिल्हा सरचिटणीसपदी जनार्दन जगताप; कोपरगाव तालुकाध्यक्षपदी विजय कापसे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या राज्य पत्रकार संघ मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीसपदी ज्येष्ठ पत्रकार जनार्दन जगताप, तर कोपरगाव तालुकाध्यक्षपदी पत्रकार प्रा. विजय कापसे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, राज्य संघटक संजय भोकरे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समिती अध्यक्ष सोमनाथ काळे यांच्या सूचनेनुसार निवड करण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांनी दिली आहे.



जनार्दन जगताप हे गेल्या ३० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. पत्रकार संघटनेतही त्यांनी विविध पदांवर जबाबदारी सांभाळली आहे. मागील २ वर्षे त्यांनी तालुकाध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करताना अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले. विशेषतः महिला दिनानिमित्त कोपरगाव तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविकांचा सन्मान करून त्यांनी राज्यभरात वेगळा आदर्श निर्माण केला होता. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर आता जिल्हा सरचिटणीसपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

तर प्रा. विजय कापसे हे गेल्या ९ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, आपल्या निर्भीड लेखणीच्या माध्यमातून अनेक उपेक्षित प्रश्नांना व विकासकामांना सातत्याने वाचा फोडत आहेत. ते पेशाने शिक्षक असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

प्रा. कापसे यांनी यापूर्वी संघटनेत सहसचिव, कार्याध्यक्ष अशा विविध पदांवर काम केले आहे. मागील २ वर्षांपासून त्यांनी सचिव म्हणून संघटनेचे काम प्रभावीपणे पुढे नेले. पत्रकार बांधवांच्या सुख–दुःखात सहभागी होत त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी बजावली आहे.

पत्रकार बांधवांच्या हितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नव्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्याने त्यांच्या निवडीकडे कार्याची पावती म्हणून पाहिले जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल तालुक्यातील पत्रकार बांधवांसह राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कामिका एकादशीनिमित्त 'वारी'तील बालगोपालांच्या दिंडीतून पंढरपूरच्या वारीचा अनुभव : बीडिओ स्वप्नील वाळुंज

**● कोपरगाव । वीरभूमी –**

ग्रामीण भागातील विद्यार्थी अत्यंत प्रतिभावान असतात. लोकसेवा व राज्यसेवा या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून सर्वाधिक कार्यरत असलेले अधिकारी हे मराठी माध्यमातील शाळेतच शिकलेले असतात. बऱ्याचदा प्रशासकीय सेवेत कार्यरत असल्याने दिंडी सोहळ्याचा आनंद घेता येत नाही. इच्छा असूनही पंढरपूरच्या वारीला जाता येत नाही.

मात्र, कामिका एकादशीनिमित्त आयोजित वारी गावातील बालगोपालांच्या दिंडीच्या माध्यमातून मला प्रत्यक्षात पंढरपूरच्या दिंडीचा अनुभव घेता आला. याचे खरोखरच समाधान आहे. वारी गावातील रामेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा पटदेखील चांगला आहे. त्यामुळे हीच मुले पुढील काळात वारी गावाचे नाव निश्चितच मोठे करतील, असे गौरवोद्गार कोपरगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी स्वप्नील वाळुंज यांनी काढले.



कोपरगाव तालुक्यातील वारी येथे रयत शिक्षण संस्थेचे श्री रामेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वारी यांच्या संयुक्त विद्यमाने कामिका एकादशीनिमित्त शनिवारी भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात दोन्ही विद्यालयातील ४३० पेक्षा अधिक विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये महिला पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. या संपूर्ण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून कोपरगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी स्वप्नील वाळुंज बोलत होते.

सालाबादप्रमाणे कामिका एकादशीनिमित्त दोन्ही शाळांतील शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी जय्यत तयारी केली होती. यामध्ये विठ्ठल–रखुमाई, संत तुकाराम महाराज यांची, तर उर्वरित विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेषभूषा परिधान केली होती. त्याचबरोबर लेझीम पथक, भक्तिगीते, जिल्हा परिषदेच्या बालगोपालांनी पालखीमध्ये विविध शैक्षणिक पुस्तके घेऊन दिंडी काढली. चिमुकल्यांच्या तोंडून 'जय हरी विठ्ठल', 'राम कृष्ण हरी', 'विठ्ठल माझा मी विठ्ठलाचा', 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' या नामघोषाने संपूर्ण वारी गावचा परिसर दुमदुमला होता. यातून काही काळ गावामध्ये अत्यंत भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

त्यानंतर श्री रामेश्वर विद्यालयात रिंगण सोहळा पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी पांडुरंगाच्या भक्तिगीतांवर नृत्य, फुगडी व पावल्या सादर केले. तद्नंतर ग्रामपंचायत सदस्य राहुल मधुकरराव टेके पाटील व्यासपीठावर नाद संगीत विद्यालयाचे संचालक हभप शंकर महाराज गोंडे यांच्या संकल्पनेतून भक्तिगीतांच्या मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष पत्रकार रोहित टेके, सदस्य ॲड. शरद जोशी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव टेके, कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाशराव गोर्डे, माजी पंचायत समिती सदस्य अशोकराव कानडे, श्रीराम चव्हाण, परसराम टेके, मुख्याध्यापक शरीफ शेख, मुख्याध्यापक चंद्रकांत माळी, दत्तात्रय गोर्डे, वाहेदखान पठाण, हभप शंकर महाराज गोंडे, हभप बाबासाहेब महाराज शिंदे, अजय महाराज तुपे, शुभम महाराज तुपे, डॉ. हिमांशू त्रिवेदी, वाल्मिक जाधव, प्रदीप खैरनार, योगेश वाळुंज, अमोल वाघ यांच्यासह पालक व महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पाथर्डीत भव्य रथयात्रा

**ढोल-लेझीम, टाळ पथकांसह विविध पथकांचा सहभाग । सर्वधर्मीय नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुका जन्मभूमी, दीक्षाभूमी व कर्मभूमी असलेल्या राष्ट्रसंत आचार्यसम्राट श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त श्री तिलोक जैन परिवाराच्या वतीने शहरातून भव्य रथयात्रा मिरवणूक काढण्यात आली. रथयात्रेची सुरुवात गुरु रत्नऋषीजी यांच्या जन्मस्थळ असलेल्या माणिकदौंडी येथून सकाळी झाली. दुपारी रथयात्रा पाथर्डी शहरात दाखल झाली.

जय भवानी चौकातील गणपती मंदिरापासून मिरवणुकीस प्रारंभ झाला. आकर्षक सजविलेल्या रथात आचार्यसम्राट आनंदऋषीजी महाराजांची प्रतिमा ठेवण्यात आली होती. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रथाचे पूजन करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली.



यावेळी महंत माधवबाबा, मोहन महाराज सुडके, नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, मुख्याधिकारी संतोष लांडगे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, माजी नगरसेवक बंडू बोरुडे, चांद मनियार, संस्थेचे सचिव सतीश गुगळे, सुरेश कुचेरिया, विश्वस्त धरमचंद गुगळे, राजेंद्र मुथा, डॉ. ललित गुगळे, डॉ. सचिन गांधी, डॉ. अभय भंडारी, चांदमल देसर्डा, संपतलाल गांधी, माजी प्राचार्य जी. पी. ढाकणे, प्राचार्य व नगरसेवक अजय भंडारी, अमोल गर्जे, नगरसेविका दीपाली बंग, नंदकुमार शेळके यांच्यासह जैन बांधव व आनंदभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले.

मिरवणुकीत ढोल पथक, कलशधारी मुलींचे पथक, मुलींचे लेझीम पथक, वारकरी वेशभूषेतील टाळ पथक, टिपरी पथक, बँड पथक, झांज पथक आदी विविध पथकांनी सहभाग घेतला. भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण शहर चैतन्यमय झाले होते.

चौकाचौकात रथयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. महाराजांची प्रतिमा असलेल्या रथाचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली. मिरवणुकीत सर्वधर्मीय नागरिक सहभागी झाले होते. विद्यालयातील शिक्षकांनी मिरवणुकीचे उत्कृष्ट नियोजन केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध खेळ व नृत्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. तालबद्ध व उत्साहपूर्ण लेझीम पथक हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सहभागी विद्यार्थ्यांचे नागरिकांनी कौतुक केले.

मिरवणूक मार्गावर आनंद प्रतिष्ठान, महावीर युवा मंच, माजी नगरसेवक रामनाथ बंग मित्र मंडळ, जैन युथ फेडरेशन, जैन युवा संघटना व कुचेरिया परिवार यांच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोपहार, फळे, चॉकलेट, बिस्कीट, लेमन गोळी, शरबत व पाण्याचे वाटप करण्यात आले.

दोन दिवसीय जयंती कार्यक्रमाची सांगता उद्या आनंदऋषी महाराजांच्या जन्मगावी शिराळ चिचोंडी येथे होणार आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## दहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या गटप्रवर्तकांचा शासन निर्णयात समावेश करा

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानात १७-१८ वर्षांपासून कार्यरत असलेल्या गटप्रवर्तकांनाही सेवेत स्थैर्य द्यावे, अशी मागणी आशा व गटप्रवर्तक संघटनेने केली आहे. शासनाने ३० जून २०२६ रोजीच्या निर्णयानुसार अभियानातील १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांना अभिसंख्य पदे निर्माण करून नियमित सेवेत घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत करत, त्याच धर्तीवर दीर्घकाळ सेवा देणाऱ्या गटप्रवर्तकांचाही समावेश करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. गटप्रवर्तक हे ग्रामीण आरोग्य यंत्रणेतील महत्त्वाचा दुवा असून, एका गटप्रवर्तकाकडे सरासरी १७ ते २५ गावांची जबाबदारी असते. आरोग्य योजनांची माहिती पोहोचविणे, गावांना भेटी देणे, कामाचा आढावा व अहवाल तयार करणे, प्रशिक्षण देणे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय साधणे, अशी विविध कामे ते करतात. मात्र, दीर्घकाळ सेवा करूनही त्यांना नोकरीचे स्थैर्य, पेन्शन, विमा यांसारख्या सामाजिक सुरक्षेच्या सुविधा उपलब्ध नाहीत. सध्या १९ हजार ६२५ रुपये मानधन मिळत असले तरी मोठ्या कार्यक्षेत्रामुळे प्रवास व इतर खर्चाचा भार त्यांनाच सहन करावा लागतो. ३० जूनच्या शासन निर्णयात १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या गटप्रवर्तकांचा समावेश करावा, स्वतंत्र प्रवास भत्ता द्यावा आणि संघटनेशी अधिकृत चर्चा करून त्यांच्या मागण्यांवर निर्णय घ्यावा, अशी मागणी राज्य उपाध्यक्ष ड. कॉ. सुधीर टोकेकर यांनी केली. जिल्हा मार्गदर्शक गटप्रवर्तक सुवर्णा थोरात यांनीही यासाठी आरोग्यमंत्री आबिटकर यांची भेट घेऊन मागण्यांबाबत चर्चा केली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत स्थैर्य देताना, त्याच अभियानाचा महत्त्वाचा भाग असलेल्या गटप्रवर्तकांनाही न्याय मिळायला हवा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

## विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात भाई सथ्था नाईट हायस्कूल राज्यात द्वितीय

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

विविध कारणांमुळे शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुंबई येथील मासूम संस्थेच्या मूल्यांकनात सर्वाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांना दहावीच्या परीक्षेला बसविणाऱ्या शाळांमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला. 'शिक्षणदूत' मोहिमेच्या माध्यमातून आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षणापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना पुन्हा शाळेत आणण्यासाठी प्रयत्न केले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मासूम संस्थेचे डायरेक्टर कमलाकर माने, एस.एस.सी. प्रमुख गुरुप्रसाद पाटील आणि प्रोग्राम हेड संदीप शेलार यांच्या हस्ते नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य सुनील सुसरे आणि ज्येष्ठ शिक्षक गजेंद्र गाडगीळ यांना ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. शिक्षणासाठी वयाची मर्यादा नसून इच्छाशक्ती आणि जिद्द महत्त्वाची आहे. रात्रशाळेत केवळ पाठ्यपुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांना जीवनात सक्षमपणे उभे राहण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि कौशल्यविकासावर भर दिला जातो, असे डॉ. पारस कोठारी यांनी सांगितले. या शाळेत नवरा-बायको, सासू-सून, आई-मुलगी तसेच वडील-मुलगा यांनी एकाच वर्गात शिक्षण घेतल्याची उदाहरणे आहेत. परिस्थितीमुळे शिक्षण खंडित झाले तरी योग्य मार्गदर्शन व जिद्दीच्या बळावर पुन्हा शिक्षण सुरू करता येते, हे शाळेने आपल्या कार्यातून सिद्ध केले असल्याचे कमलाकर माने यांनी सांगितले. मासूम संस्थेच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांसोबतच व्यावसायिक प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणाऱ्या प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## २२ वर्षांच्या सैन्यसेवेनंतर मायभूमीत वीरपुत्राचे जंगी स्वागत

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

भारतीय सेनेच्या सप्लाय कोअरमध्ये तब्बल २२ वर्षे देशसेवा बजावल्यानंतर नायब सुभेदार अमोल पळसकर यांचे मायभूमी खारेकर्जुने (ता. जि. अहिल्यानगर) येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पंचक्रोशीतील शेकडो आजी-माजी सैनिक, वीरपिता, वीरनारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात पार पडला. ढोल-ताशांचा गजर, देशभक्तीपर गीतांचा निनाद आणि फटाक्यांची आतषबाजी अशा उत्सवी वातावरणात अमोल पळसकर यांची जीपमधून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील रस्त्यांवर सडा-रांगोळी काढून ग्रामस्थांनी आपल्या वीरपुत्राचे उत्स्फूर्त स्वागत केले. जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील शेळके यांनी सैनिकांच्या सेवेनंतरच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. सैनिक सेवेत असताना त्याचा सन्मान होतो; मात्र निवृत्तीनंतर त्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषतः सैनिकांच्या शेतजमिनींसह अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे सैनिकांचे संघटन मजबूत असणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ९४ वर्षीय मेजर नाना निमसे होते. अमोल पळसकर यांचे वर्गमित्र असलेले पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनातील आठवणींना उजाळा देत त्यांच्या सेवाभावाचे कौतुक केले. यावेळी जिल्हा बँक संचालक रावसाहेब पाटील शेळके, पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, आरोग्य अधिकारी संतोष कराळे, त्रिदल सैनिक संघाचे अध्यक्ष संजय म्हस्के, कॅप्टन राजेंद्र दारकुंडे, मेजर निळकंठ उल्हारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पंचक्रोशीतील आजी-माजी सैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धरण क्षेत्रात मत्स्य व्यवसाय विकासासाठी संयुक्त सर्वेक्षण करणार

**ना. राधाकृष्ण विखे पाटील । मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यांच्यासह संयुक्त बैठकीत प्रतिपादन**

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**

जलसंपदा विभागाच्या धरणांमध्ये मत्स्य व्यवसाय विकास विभागाशी सहकार्य आणि समन्वय वाढवण्यात येणार आहे. स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देता यावे यादृष्टीने दोन्ही विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती सर्वेक्षण करण्यात येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली यावेळी मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, आमदार प्रकाश सावंत, प्रधान सचिव रामास्वामी एन, सचिव लाभक्षेत्र विकास प्रकाश मिसाळ, मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त प्रेरणा देशभ्रतार , जलसंपदा आणि मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील पुढे म्हणाले या दृष्टीने विभागाने आधीच पावलं टाकले असून उजनी धरणातील मासेमारी विकास साठी प्रक्रिया राबविण्यासाठी सुरुवात केली गेली आहे. मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र विभागातील अशा धरणांची माहिती देखील एकत्रित केली जाईल या दृष्टीने त्यांनी यावेळी निर्देश दिले.

जलसंपदा मंत्री विखे पाटील म्हणाले जलसंपदा आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या वतीने संयुक्तरित्या अशा धरणांच्या माहितीचा सर्वेक्षण आणि विश्लेषण करून कार्यवाही करण्यास गती देण्यात येईल. यासाठी जलसंपदा विभागाच्या चारही मुख्य अभियंता यांना जबाबदारी देण्यात येत असून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ यामधील धरणांमध्ये मासेमारीच्या दृष्टीने आवश्यक माहिती एकत्रित केली जाईल.

मत्स्य व्यवसाय विकास मंत्री नितेश राणे म्हणाले, जलसंपदा विभागाशी समन्वय राखण्यासाठी मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त यांना जबाबदारी देण्यात येत आहे. मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने जवळपास २५०० धरण आणि तलाव यातील मासेमारीसाठी मच्छीमारांच्या सहकारी संस्थांना संधी दिली जाते. विभागाने याबाबत पारदर्शक व आधुनिकता आणण्यासाठी डिजिटायझेशन, मॅपिंग केले गेले आहे आणि रियल टाईम डाटा सर्विसलेन्स प्रणाली कार्यरत केली आहे. जलसंपदा विभागाच्या विविध धरणांमध्ये देखील स्थानिक मच्छीमारांना मासेमारीसाठी संधी मिळावी यादृष्टीने विभाग प्रयत्नशील आहे असे मंत्री श्री राणे म्हणाले.

यासह जलसंपदा विभागाच्या अंतर्गत धरणांमधील गाळ काढण्यासाठी व जल साठवण क्षमता वाढविण्यासाठी कार्यवाही केली जाते त्या मध्ये मत्स्य व्यवसाय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या धरणातील व तलावातील गाळ काढण्यासाठी देखील सहकार्य मिळावे असे श्री राणे म्हणाले.

यावेळी गोड्या पाण्यातील मासेमारी, सहकारी मच्छीमार संस्था, तलावातील मासेमारीसाठी ठेका पद्धती, दोन्ही विभागांशी संबंधित विविध बाबी, मासेमारीसाठी राबविण्यात येणारी प्रक्रिया आदी विषयाबाबत चर्चा झाली.

## सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने पाथर्डीत १७ व १८ ऑगस्टला शिवकालीन शस्त्र, वस्तू व नाण्यांचे प्रदर्शन

**● पाथर्डी । वीरभूमी -**

इतिहासाच्या पाऊलखुणा जपत नव्या पिढीला समृद्ध शौर्यपरंपरेची ओळख करून देण्यासाठी सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने पाथर्डी शहरात 'भव्य ऐतिहासिक शस्त्र व नाणी प्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. 'युगंधर शस्त्र संग्रह' या संकल्पनेतून साकारलेले हे प्रदर्शन दि. १७ व १८ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवस नागरिकांसाठी खुले राहणार आहे.




पाथर्डी शहरातील मा. आ. स्व. माधवराव निऱ्हाळी खुले नाट्यगृह येथे सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत हे प्रदर्शन पाहता येणार आहे. प्रदर्शनात प्राचीन व ऐतिहासिक काळातील विविध प्रकारची शस्त्रे, युद्धसाहित्य तसेच दुर्मीळ ऐतिहासिक नाण्यांचा संग्रह पाहता येणार आहे.

प्रदर्शनात सुवर्णजडित तलवार, मराठा धोप तलवार, नागर तलवार, तलवार-मूठ, कुण्ता (भाला), तबर, विळा, दांडपट्टा, गुप्ती, जंबिया, खंजीर, वाघनखे, चिलखत, शिरस्त्राण, कट्यार, विजय कट्यार, अडकित्ते, तोफगोळे, गुर्ज, अंकुश यांसह विविध शस्त्रांचे दर्शन घडणार आहे. तत्कालीन युद्धपद्धती आणि युद्धसाहित्यासंदर्भातील विविध वस्तूंचाही प्रदर्शनात समावेश आहे.

या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे १५० हून अधिक ऐतिहासिक नाणी तसेच ३०० हून अधिक शिवकालीन वस्तू व शस्त्रसामग्री. विविध काळातील नाण्यांची रचना, त्यावरील चिन्हे आणि तत्कालीन शस्त्रांची ठेवण यामुळे इतिहासप्रेमी, विद्यार्थी व नागरिकांसाठी हे प्रदर्शन अभ्यासपूर्ण ठरणार आहे.

इतिहास केवळ पुस्तकातून न शिकता प्रत्यक्ष ऐतिहासिक वस्तूंच्या माध्यमातून अनुभवता यावा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यपरंपरेशी संबंधित शस्त्रसंस्कृती व ऐतिहासिक वारशाची नव्या पिढीला माहिती व्हावी, या उद्देशाने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची आवड निर्माण करण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणार आहे.

पाथर्डी शहरासह तालुक्यातील नागरिकांनी या दुर्मीळ ऐतिहासिक शस्त्र व नाणी प्रदर्शनास आवर्जून भेट देऊन इतिहासाचा हा अनोखा ठेवा अनुभवावा, असे आवाहन सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाथर्डी ते अक्कलकोट एसटी सेवा सुरू केल्याबद्दल स्वामीभक्तांकडून आगारप्रमुख अमित बनसोडे यांचा सत्कार

**● पाथर्डी । वीरभूमी -**

पाथर्डी ते श्री स्वामी समर्थ महाराजांची कर्मभूमी असलेल्या अक्कलकोट मार्गावर अखेर नवीन एसटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेमुळे पाथर्डी शहरासह परिसरातील स्वामीभक्त आणि प्रवाशांची अक्कलकोटला ये-जा करण्याची मोठी सोय झाली आहे. बससेवा सुरू झाल्याबद्दल स्वामीभक्तांच्या वतीने पाथर्डी आगारप्रमुख अमित बनसोडे यांचा श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला.



पाथर्डी व परिसरातून अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक जातात. मात्र, पाथर्डीहून अक्कलकोटसाठी थेट एसटी सेवा नसल्याने भाविकांसह सर्वसामान्य प्रवाशांना प्रवासात अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी स्थानिक स्वामीभक्त व नागरिकांकडून या मार्गावर थेट एसटी बस सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती.

प्रवाशांची मागणी आणि भाविकांची गैरसोय लक्षात घेऊन एसटी प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेत पाथर्डी-अक्कलकोट बससेवा सुरू केली. त्यामुळे स्वामीभक्तांमध्ये समाधानाचे वातावरण असून नागरिकांकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

बससेवा सुरू झाल्याचे औचित्य साधून बसस्थानकात स्वामीभक्तांनी एकत्र येत आनंद व्यक्त केला. यावेळी कालभैरवनाथ देवस्थानचे दादा मर्दाने यांच्या हस्ते आगारप्रमुख अमित बनसोडे यांना श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रतिमा भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी पाथर्डी युवासेना शहरप्रमुख सचिन नागापूरे, स्वामीभक्त राहुल पालवे, सुनील बांगर, संतोष बुरसे, देविदास उरणकर, भूषण नागापूरे तसेच व्यापारी वर्गातील विठ्ठलराव कल्याणकर, अशोकराव वेदपाठक आदी उपस्थित होते.

# आदिवासी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती शिक्षणाच्या बळावर साकारावीत

**आमदार विवेकभैय्या कोल्हे । संजीवनीच्या आदिवासी आश्रमशाळेत आदिवासी दिन साजरा**

**● कोपरगाव । वीरभूमी -**

आदिवासी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि शिक्षणाच्या बळावर ती साकार करावीत. संजीवनी सारख्या संस्थेचे पाठबळ घेऊन भविष्यात देशातील उच्च पदांवर पोहोचत कोपरगाव तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन विधान परिषद सदस्य आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले. तसेच शासकीय व अनुदानित आश्रमशाळांसमोरील विविध प्रश्नांकडे जातीने लक्ष घालून शासनदरबारी पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित कोपरगांव तालुक्यातील टाकळी येथिल एकलव्य आदिवासी अनुदानित आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी संस्कृती, कला व परंपरांचे जतन करत विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला शिक्षणाची जोड देण्याचा संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचा दृष्टिकोन यावेळी अधोरेखित झाला.

यावेळी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी संजीवनीच्या कार्यपरंपरेचा गौरव केला. स्वर्गीय सहकारमहर्षी माजी मंत्री शंकररावजी कोल्हे यांनी समाजकारण व शिक्षण क्षेत्रात निर्माण केलेला वसा आज अध्यक्ष नितीनदादा कोल्हे आणि कार्यकारी विश्वस्त श्री अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त श्री सुमित कोल्हे तळमळीने पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी विध्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व योग्य संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र ओळख निर्माण करू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या वारली चित्रांमधून आदिवासी समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा व कला वैभवाचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांनी शिक्षणामुळे जीवनात झालेला सकारात्मक बदल आणि भविष्यातील ध्येयांविषयी केलेली भाषणेही लक्षवेधी ठरली.



सदर प्रसंगी श्री सुमित कोल्हे यांनी एकलव्य आश्रमशाळेच्या भविष्यातील विकासाची दिशा स्पष्ट केली. संजीवनीच्या इतर शाखांप्रमाणेच टाकळी येथील आश्रमशाळेतही दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणासोबत क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम व व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी देऊन एकलव्य आश्रमशाळेला आदिवासी विध्यार्थ्यांच्या विकासाचे आदर्श रोल मॉडेल बनविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक निलेश देवकर, गणेश सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्री शिवाजीराव लहारे, टाकळीचे सरपंच संदीप देवकर, माजी सभापती सुनील देवकर, पोलीस पाटील राजेंद्र देवकर, प्राथमिक विभागचे मुख्याद्यापक आण्णासाहेब टकले, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मीरा जोशी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, आदिवासी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नागलवाडी दरोड्याची उकल करण्यात पोलिसांना यश ; २१ तोळे सोने जप्त

**वृद्ध दाम्पत्याला चाकूचा धाक दाखवून ५५ तोळे सोने व रोख रक्कम लुटली । चौघांना अटक**

**● शेवगाव । वीरभूमी -**

तालुक्यातील नागलवाडी येथे घरात घुसून वृद्ध दाम्पत्याला मारहाण करून कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटल्याच्या दरोड्याचा शेवगाव पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून लुटलेल्या सोन्यापैकी २१ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मार्च २०२६ रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास नागलवाडी येथील राम मारुती गिते (वय ६५) हे घरात झोपलेले असताना अज्ञात इसमांनी घरात प्रवेश केला. गिते यांच्या गळ्याला चाकू लावून धाक दाखवत कपाटातील ५५ तोळे सोन्याचे दागिने व एक लाख रुपये रोख असा मुद्देमाल जबरदस्तीने लुटून नेला. याप्रकरणी गिते यांच्या फिर्यादीवरून १४ मार्च रोजी शेवगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाला वेग दिला. स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने संशयितांचा माग काढत पोलिसांनी राम कृष्ण चव्हाण, करण रामनाथ भोसले व ओंकार पांडुरंग दहीवाळ या तिघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. गुन्हा करताना त्यांच्यासोबत राहुल रज्जाक काळे हाही सहभागी असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर तपास पथकाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी राहुल काळे याला अटक केली.

काळे याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने लुटलेल्या मुद्देमालाबाबत माहिती दिली. त्याच्या माहितीनुसार पोलिसांनी २१ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. उर्वरित मुद्देमाल तसेच गुन्ह्यात सहभागी अन्य व्यक्तींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक बाजीराव सानप, पोलिस कर्मचारी ईश्वर बेरड, शाम गुंजाळ, एकनाथ गर्कळ, राजू बडे, राहुल आठरे, प्रशांत आंधळे, राहुल खेडकर, सचिन पिरगळ, अर्जुन ढवळे, सायबर सेलचे राहुल गुढे व अर्जुन सांगळे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक बाजीराव सानप करीत आहेत.




शेवगाव : नागलवाडीतील दरोडयात आरोपींसह पोलीस निरीक्षक मोहन बोरसे व पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी आदी.

# संगमनेरच्या रेल्वेसाठी आंदोलन नव्हे, जिद्दीने पाठपुरावा करू, रेल्वेसाठीही सर्वात पुढे उभा राहीन

## डॉ. सुजय विखे पाटील । रहिमपूरमध्ये जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

**● संगमनेर । वीरभूमी–**

आदिवासी समाजाने विखे पाटील परिवारावर गेल्या ४० वर्षांपासून दाखवलेले प्रेम आणि विश्वास ही आमच्यासाठी केवळ राजकीय ताकद नसून मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे समाजाच्या प्रत्येक प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहून तो मार्गी लावण्यासाठी आम्ही तत्परतेने काम करत राहू, अशी ग्वाही डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

रहिमपूर ता संगमनेर येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शांताराम शिंदे होते. व्यासपीठावर गणपतराव शिंदे, मारुतीराव मेंगाळ, संविधाताई शिंदे, रामभाऊ राहाणे, आशिष शेळके, प्रभाकर गुळवे, राहुल दिघे, अरुणराव शिंदे, एस.पी. आहेर, गोरख वाळुंज, किशोर वाघमारे, रोहित चौधरी, भैया मोरे, पप्पू गाढे, सचिन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. जागतिक आदिवासी दिनानिमित्त मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या समाजबांधवांचे डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांनी आभार मानले.

मागील वर्षी आदिवासी समाज बांधवांना दिलेल्या शब्दांची पूर्तता करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, १८ वर्षांखालील मुलांसाठी आधारकार्ड शिबिर घेऊन आधारकार्ड उपलब्ध करून देण्यात आले. पावसाळ्यात काही कुटुंबांच्या घरात पाणी शिरत असताना ते स्वतः घटनास्थळी जाऊन मदत केली. यंदा त्या घरांमध्ये पाणी जाण्याची परिस्थिती निर्माण झाली नाही. आता याच व्यासपीठावरून पुन्हा एक शब्द देतो की, पुढील वर्षी या कार्यक्रमाला येण्यापूर्वी वेडू आई सभामंडपाचे काम पूर्ण झालेले असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे म्हणाले पद, मंत्रीपद किंवा राजकीय जबाबदाऱ्या येतात–जातात, मात्र केलेले काम अनेक वर्षे लोकांच्या लक्षात राहते. त्यामुळे काम हीच आमची ओळख आहे, असे सांगत डॉ. विखे पाटील यांनी दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांच्या कार्याचा आणि पुण्याईचा उल्लेख केला. सर्वसामान्यांच्या आशीर्वादामुळे विखे पाटील परिवाराला समाजासाठी काम करण्याची संधी मिळाली असून ती संधी जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वापरणे हीच आमची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी समाजाचा केवळ मतदानापुरता विचार न करता समाजात जाऊन त्यांचे छोटे–मोठे प्रश्न समजून घेण्याची गरज आहे. समाजातील मुलांनी शिक्षण घेतले तर त्यांच्या परिवाराला आधार मिळेल आणि समाजाचे भविष्य घडेल. पुढील पाच–दहा वर्षांत आदिवासी समाजातील एखादी मुलगी किंवा मुलगा जिल्ह्याच्या प्रशासनातील सर्वो च्च पदावर पोहोचावा, यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून काम करण्याचा संकल्प करण्याची गरज आहे, असेही डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

संगमनेरच्या रेल्वेच्या प्रश्नावरही डॉ. सुजय विखे पाटील यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. संगमनेरच्या विकासासाठी रेल्वेची आवश्यकता आहे आणि संगमनेरमार्गे रेल्वे नेण्याची होण्यासाठी तर आपण सर्वात पुढे उभे राहून त्या मागणीला पाठिंबा देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच रेल्वेसाठी केवळ आंदोलन करून प्रश्न सुटत नाहीत, त्यासाठी सातत्य, जिद्द आणि शासनाच्या पातळीवर एकत्रित प्रयत्न आवश्यक असतात. शिर्डीला रेल्वे आणण्यासाठी ज्या पद्धतीने प्रयत्न झाले, त्याच जिद्दीने संगमनेरलाही रेल्वे स्थानक आणि रेल्वे सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असा शब्द डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिला.

संगमनेरचा विकास झाला पाहिजे ही भूमिका स्पष्ट करताना महायुती सरकार संगमनेर तालुक्याच्या प्रश्नांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती सरकारच्या माध्यमातून आवश्यक पाठपुरावा करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

एखादा प्रश्न नियमात बसत नाही म्हणून तो नाकारण्याची भूमिका घेता कामा नये. समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक त्या पद्धतीने मार्ग काढणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. गरीबांच्या डोळ्यातील पाणी



पुसता आले, त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणता आले आणि त्यांच्या कुटुंबाला चांगले जीवन देता आले, तर त्याच कामाला खऱ्या अर्थाने लोकसेवा म्हणता येईल, अशी भूमिका डॉ. विखे पाटील यांनी मांडली.

आदिवासी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत पुढील अधिवेशनात आवाज उठवून सरकारचे लक्ष वेधणार असल्याची ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली. आदिवासी समाजातील नागरिकांच्या जमिनी बळकावण्याच्या तक्रारींबाबत प्रशासनाच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू असून, संबंधितांना न्याय मिळवून देण्यासाठी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आदिवासी समाजाच्या पारंपरिक वनहक्कांशी संबंधित जमिनींच्या नोंदी, स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना यांसारख्या प्रश्नांवर शासनाने घेतलेल्या निर्णयांचा लाभ समाजातील मोठ्या संख्येने नागरिकांना होत असल्याचे आमदार खताळ यांनी नमूद केले.

शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील युवकांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. आश्रमशाळा, वसतिगृहे आणि इतर शैक्षणिक सुविधांचा लाभ घेत युवकांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. आदिवासी समाजाच्या आरोग्य, जमीन, शिक्षण आणि इतर मूलभूत प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याचे आश्वासन देताना आमदार खताळ म्हणाले की, डॉ. सुजय विखे पाटील यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्व आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या छोट्या–मोठ्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू.

संगमनेर तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या प्रश्नांना आगामी अधिवेशनात सभागृहात मांडून सरकारचे लक्ष वेधणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले.

# डॉ. रंगनाथन यांचे ग्रंथालय चळवळीत अमूल्य योगदान

## प्राचार्य डॉ. बबन चौरे । बाबूजी आव्हाड महाविद्यालयात १३४ वी जयंती उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी –**

भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विकासात तसेच ग्रंथालय चळवळीत पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे अमूल्य योगदान आहे. त्यामुळे त्यांना भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांनी ग्रंथालयशास्त्राची पाच मूलभूत सूत्रे मांडली. ‘ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत’, ‘प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे’, ‘प्रत्येक वाचकाला ग्रंथ मिळाला पाहिजे’, ‘वाचकांचा वेळ वाचला पाहिजे’ आणि ‘ग्रंथालय हे वर्धिष्णू आहे’, या सूत्रांना जगभर मान्यता मिळाली. डॉ. रंगनाथन यांचे कार्य भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले.



बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या ग्रंथालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. चौरे म्हणाले, आजच्या डिजिटल आणि सोशल मीडियाच्या युगातही ज्ञान मिळविण्याचा सर्वात विश्वासार्ह मार्ग ग्रंथालय आहे. ग्रंथालय हे व्यवस्थापनशास्त्र असून त्याकडे समाजाभिमुख दृष्टीने पाहण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन यांनी मांडला. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगत युगात ग्रंथालये व ग्रंथपालांनी वाचकांना पुन्हा ग्रंथालयाकडे वळविण्यासाठी जोमाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्राचीन अथवा वर्तमान विषय, विज्ञान–तंत्रज्ञान, साहित्य किंवा कर्तृत्ववान व्यक्तींची चरित्रे अशा विविध विषयांचे ज्ञान मिळविण्याचे महत्त्वाचे केंद्र ग्रंथालय आहे. ग्रंथालय हे गरीब विद्यार्थ्यांसाठी वरदान असून महापुरुषांची चरित्रे आणि उपदेशात्मक साहित्य जीवनाला दिशा देतात. आज वाचनाची आवड कमी झालेली नसून तिचे स्वरूप बदलले आहे. मोबाईल व सोशल मीडियाच्या वाढत्या वापराच्या काळातही कोणत्याही विषयाचे सखोल ज्ञान ग्रंथांमधूनच मिळते.

नवीन शैक्षणिक धोरणात ग्रंथालयाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. ग्रंथालय हे प्रत्येक महाविद्यालयाचा आत्मा असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात ग्रंथालय आणि ग्रंथपालांची भूमिका महत्त्वाची आहे, असेही डॉ. चौरे यांनी सांगितले.

यावेळी ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड, पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, डॉ. अरुण राख, डॉ. भगवान सांगळे, प्रा. आशा पालवे, प्रा. माया पवार, अभिजीत आव्हाड, सुनीता पालवे, मेघा पोव्हरे, गौरव एडके तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# २४ तासांत जबरी चोरीचा छडा; दोघे जेरबंद

## शस्त्राचा धाक दाखवून रोख रकमेसह फोन पे वरून पैसे उकळले । श्रीगोंदा पोलिसांची कारवाई

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

शस्त्राचा धाक दाखवून वाहनचालकाला धमकावत मारहाण करून रोख रक्कम तसेच मोबाईलमधील फोन पेद्वारे ऑनलाइन पैसे जबरदस्तीने वळवून घेणाऱ्या दोघांना श्रीगोंदा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले. राम राजेंद्र माने (वय २८, रा. कर्जत) आणि बबलू शामराव पिटेकर (वय ३०, रा. काष्टी, ता. श्रीगोंदा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. न्यायालयाने दोघांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट रोजी सायंकाळी सातच्या सुमारास फिर्यादी इकबाल हनिफ खान हे कोल्हापूरहून दौंड–अहिल्यानगर मार्गे जात असताना लोणी व्यंकनाथ शिवारात अज्ञात व्यक्तींनी त्यांचा मार्ग अडविला. आरोपींनी शस्त्राचा धाक दाखवून त्यांना धमकावले व मारहाण केली. त्यानंतर त्यांचा मोबाईल हिसकावून घेत रोख रक्कम तसेच फोन पे खात्यातून आरोपींच्या खात्यावर ऑनलाइन पैसे जबरदस्तीने ट्रान्सफर करून घेतले. याप्रकरणी इकबाल हनीफ शेख रा. बोनखेडे कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तातडीने तपास सुरू केला. सायबर सेलच्या मदतीने आरोपींनी ज्या बँक खात्यावर आणि फोन पे क्रमांकावर पैसे वळवून घेतले, त्याचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. या तपासातून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

पोलिसांच्या चौकशीत आरोपींनी पैशांच्या आमिषापोटी गुन्हा केल्याची माहिती समोर आली. गुन्ह्यात वापरलेला मोबाईल तसेच ऑनलाइन पैशांच्या व्यवहारासंबंधीचे डिजिटल पुरावे पोलिसांनी जप्त केले आहेत. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच जबरीने घेतलेल्या रकमेबाबत पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या देखरेखीखाली करण्यात आली.

तपास पथकात पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर, रसूल शेख, पुष्कर कडू, पोलीस हेड कॉन्स्टेबल अविनाश काटकर, पोलीस कॉन्स्टेबल अरुण पवार, वैजिनाथ कुटे, मयूर तोरडमल, देविदास पळसे, राहुल मोढळे, चालक साळवे आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल गीतांजली लाड यांचा समावेश होता.

पोलिसांच्या तातडीच्या तपासामुळे अवघ्या २४ तासांत गुन्ह्याचा छडा लागल्याने श्रीगोंदा पोलिसांच्या तांत्रिक तपास कौशल्याचे कौतुक होत आहे.

# रोटरीने समाजाचे प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याचे व्हिजन ठेवावे

## विलास शिंदे । रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या पदग्रहण सोहळ्यात नूतन पदाधिकाऱ्यांचा पदभार

**● अकोले । वीरभूमी –**

संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या ‘हे विश्वची माझे घर’ या उक्तीचे जगातील २०० देशांत कार्यरत असलेले रोटरी क्लब हे उत्तम उदाहरण आहे. रोटरीने समाजातील प्रश्न तात्पुरते न सोडविता ते कायमस्वरूपी सुटतील, असे व्हिजन ठरवून काम करावे, असे प्रतिपादन उद्योजक तथा सह्याद्री फार्म्स, नाशिकचे चेअरमन विलास शिंदे यांनी केले.

रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या २०२६–२७ या वर्षासाठीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा मातोश्री लॉन्स येथे उत्साहात झाला. यावेळी शिंदे बोलत होते. गंगाराम करवर (अध्यक्ष), सचिन आहेर (सेक्रेटरी), संदीप भोर (उपाध्यक्ष), परमानंद शिंदे (सहसेक्रेटरी) आणि प्राचार्य डॉ. संजय ताकटे (खजिनदार) यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी व्यासपीठावर डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेशभाई पटेल, प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, नगराध्यक्ष सौ. सोनाली नाईकवाडी, उपप्रांतपाल आनंद हासे, माजी उपप्रांतपाल अमोल वैद्य, डिस्ट्रिक्ट असोसिएट टीआरएफ डायरेक्टर प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, २०२५–२६ चे माजी अध्यक्ष अमोल देशमुख तसेच नूतन पदाधिकारी उपस्थित होते. संगमनेर रोटरीचे समीर शहा, अजित काकडे, सुनील कडलग, मोहित मंडलिक यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य, रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे सदस्य, शेतकरी, नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विलास शिंदे म्हणाले, भारताला कृषिप्रधान देश म्हटले जाते; मात्र ग्रामीण भागाची आर्थिक परिस्थिती चिंताजनक आहे. शेतकरी वर्षभर शेतात राबूनही त्याला अपेक्षित उत्पन्न मिळत नाही, तर शहरातील सामान्य नोकरी करणाऱ्याचे उत्पन्न त्यापेक्षा कितीतरी अधिक असते. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेतील दरी कमी करण्याची गरज आहे.

अन्न, वस्त्र, निवारा यांसह शिक्षण व आरोग्याच्या मूलभूत गरजाही ग्रामीण भागात पूर्ण करणे अवघड होत आहे. सर्वात फायदेशीर व्यवसाय असलेली शेती तोट्यात का आली, याचे चिंतन करण्याची गरज आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक असून, त्या एखाद्या आजारावर तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी तो कायमचा दूर करणाऱ्या असाव्यात.

पुढील २५ वर्षांनंतर अकोले कसे असेल, याचा विचार करून आजपासून उपाययोजना कराव्यात. रोटरीने अशा प्रकारचे दीर्घकालीन व्हिजन ठेवून काम करावे, जेणेकरून भविष्यात समाजातील प्रश्न कायमचे सुटतील आणि



रोटरीचा निधी केवळ खर्च करण्यासाठी उरणार नाही, अशी परिस्थिती निर्माण व्हावी, अशी अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली.

डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेशभाई पटेल यांनी रोटरीच्या जागतिक स्तरावरील कार्याचा आढावा घेतला. रोटरी क्लब अकोलेच्या सांडपाणी जलशुद्धीकरणाच्या पायलट प्रकल्पाचा विस्तार डिस्ट्रिक्ट ३१३२ मधील १०३ क्लबमध्ये करण्यासाठी ग्लोबल ग्रँटचा प्रस्ताव दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षी मोठ्या प्रमाणावर ग्लोबल ग्रँटच्या माध्यमातून समाजोपयोगी कामे करण्यात येणार आहेत. शासकीय रुग्णालयास पाच एनआयसीयू युनिट देण्यात आली असून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले आहे. २० हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्याचे तसेच २० हजार रक्तपिशव्या संकलित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे पटेल यांनी सांगितले.

महिलांसाठी ‘रोटरी आदिशक्ती’ योजना राबविण्यात येणार असून ‘माझ्या मनात’, ‘माझी सुरक्षा’, ‘मी आदिशक्ती’ आणि ‘माझे आरोग्य’ हे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी अध्यक्ष अमोल देशमुख यांनी २०२५–२६ या वर्षातील कार्याचा अहवाल सादर केला. नूतन अध्यक्ष गंगाराम करवर यांनी २०२६–२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देऊन नागरिकांनी रोटरीच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य संजय ताकटे यांनी केले.

### नूतन सदस्यांचे पिन प्रदान करून स्वागत

■ डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेशभाई पटेल यांच्या हस्ते नूतन सदस्यांना पिन प्रदान करून त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच सुनील कडलग यांच्या माध्यमातून आश्वी येथे नव्याने स्थापन झालेल्या रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रेम भवर यांचा सत्कार करण्यात आला.

### सर्वोदय विद्यालयाला शैक्षणिक साहित्य भेट

■ डी.जी. जयेशभाई पटेल यांच्या कंपनीच्या सीएसआर निधीतून रोटरी क्लब अकोलेच्या माध्यमातून सर्वोदय विद्यालय, अबीटखिंड येथे डिजिटल क्लासरूमसाठी ४३ इंची टीव्ही, शैक्षणिक सॉफ्टवेअर, कंपोस्ट खत निर्मितीसाठी ड्रम आणि हँडवॉश स्टेशन भेट देण्यात आले.

सूत्रसंचालन प्रा. हेमंत मंडलिक यांनी केले, तर आभार सेक्रेटरी सचिन आहेर यांनी मानले.